Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३५] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर २-८, २०२१/भाद्रपद ११-१७, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १–५ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १–५ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७४.

**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम-११(१) खालील अधिसूचना.**

क्रमांक-उविअ-अका-भूसं-कावि-१५३-२०२१.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासनाचे महसूल व वनविभागाचे अधिसूचना क्रमांक एमआयएस-सीआर.७७/ए-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा केला आहे) संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा केला आहे) चे कलम ३ चे उपबंध (ई) मधील परंतुकान्वये

प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून उक्त अधिनियमांचे कलम ३ चे उपबंध (ए-झेड) नुसार परीभाषीत केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी भूमी संपादनाचे संबंधाने जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसलेल्या क्षेत्रासाठी अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ह्यांना उक्त अधिनियमाचे उद्देशासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल असे अधिसूचित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन म्हणून जिल्हाधिकारी वाशिम यांना असे दिसून आले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिन/जमिनीची (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त जमीन/जमिनी " असा केला आहे) यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये त्याच्या स्वरूपाचे विवरण दिले आहे, अशा सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा केला आहे) गरज आहे किंवा गरज लावण्याचा संभव आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमांच्या कलम ११ च्या उप-कलम (१) चे तरतुदीनुसार असे अधिसूचित करण्यात येत आहे की, उक्त जमिनीची/जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी गरज आहे, गरज लागण्याचा संभव आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्तावीत भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे यासोबत जोडलेल्या अधिसूची-तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेली आहे. (जर काही विस्थापन असल्यास त्याची कारणे या अनूसचिमध्ये नमूद करावे.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणामाचे निर्धारणाचा गोषवारा यासोबत जोडण्यात आलेल्या अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ४३ मधील उप कलम (१) नुसार पुनर्वसन आणि पुनर्स्थापनेसाठी नेमलेल्या प्रशासकाची माहिती यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये विनिर्दिष्ट केलेली आहे (जर नियुक्तीची गरज असेल तर या अनुसूचीत तसा तपशील नमूद करावा)

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ११ चे उप-कलम (४) अन्वये असे घोषित करण्यात येते की, सदर अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून उक्त अधिनियमाचे प्रकरण चार खालील प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीने उक्त जमिनीचे/जमिनींचे किंवा तिच्या/त्यांच्या भागांचे कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकन करू नये, किंवा अन्य प्रकारचा अडथळा निर्माण करू नये ;

परंतु, उक्त जमिनीचे मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिकारी विशिष्ट परिस्थितीत कारणे लेखी नोंदवून अशा जमिनीस किंवा तिचे भागास उपरोक्त तरतुदींचे अंमलबजावणी पासून सुट देवू शकतात :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने जाणीवपूर्वक या तरतुदींचे उल्लंघन केले आणि त्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा इजा पोहचली असेल तर त्याबाबत जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

यापुढे असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमांच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त नियम " असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उप-नियम (३) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अभिलेखाचे अद्ययावतीकरणचे काम हाती घेत आहेत व ते कार्य पूर्ण करीत आहेत ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमांचे कलम ३ चे उपबंध (छ) नुसार जिल्हाधिकारी हे समुचित शासन आहेत, म्हणून उक्त अधिनियमांचे अंतर्गत जिल्हाधिकारी, वाशिम यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरूळपीर यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ११-४७-२०१९-२०२०,

गाव मंगरूळपीर, तालुका मंगरूळपीर, जिल्हा वाशिम.

| अनुक्रमांक | सर्वे नंबर/ गट नंबर | अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर मी. |
| १ | २१७/२ | ०.१५.३७ |
| | एकूण .. | ०.१५.३७ |

## अनुसूची—दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण :—विकास योजना मंगरूळपीर आरक्षण क्र. १९ दुकान केंद्र विकसीत करण्याकरीता.

प्रकल्पाचे नाव :—नगर परिषद विकास योजना.

प्रकल्पाच्या कामाचा तपशील :—१६५० चौ. मी. दुकान केंद्र विकसित करण्याकरीता.

सामाजिक फायदे:—

## अनुसूची—तीन

### बाधित व्यक्तींचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही सबब माहिती निरंक.

## अनुसूची—चार

### सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक परिणामाचे निर्धारण करणा-या यंत्रणेने दिल्याप्रमाणे) **:–** महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमांचे प्रकरण दोन व प्रकरण तीन मधील तरतुदी लागू करण्यापासून सूट प्राप्त.

## अनुसूची—पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| (अ) ज्या अधिका-याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम | : | आवश्यकता नाही, सबब माहिती निरंक |
| (ब) प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता | : | निरंक |
| (क) प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसूचनेनुसार झाली आहे त्याचा तपशील | : | निरंक |

**टीप :—**उक्त जमिनीच्या/जमिनींच्या योजनेचे (Plan) चे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरूळपीर याच्या कार्यालयात निरीक्षण करता येईल.

मंगरूळपीर :
दिनांक १२ ऑगस्ट २०२१.

**एस. पी. मुळे,**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, मंगरूळपीर.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७५

## जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ** : पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे पत्र क्र.जिविशा-का.व.सु.-प्रतिबंधक-२०२१-३२०९, दिनांक १०-८-२०२१.

### मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये आदेश लागू करणेबाबत

क्रमांक कक्ष-८अ.का. (गृह)-कावि-५९१-२०२१.—

ज्याअर्थी, वाशिम जिल्ह्यात दिनांक ९-८-२०२१ रोजी पासून श्रावणमास व दिनांक १०-८-२०२१ रोजी पासून मोहर्रम सणास सुरुवात झालेली आहे. दिनांक १५-८-२०२१ रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात येणार असून दिनांक १९-८-२०२१ रोजी पासून मोहर्रम ताजीया विसर्जन करण्यात येणार आहे. तसेच दिनांक २२-८-२०२१ रोजी रक्षाबंधन/नारळी पोर्णिमा हा सण साजरा केला जाणार आहे. सद्यःस्थितीत जिल्ह्यात कोरोना विषाणु

संसर्ग प्रादुर्भाव कायम असल्याने कोविड-१९ प्रतिबंधक उपायाअंतर्गत निर्गमित प्रतिबंधक निर्देशांचे अनुपालनाचे दृष्टीने निरंतर कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत मराठा आरक्षण संदर्भातील मागणीचे अनुषंगाने मराठा समाज बांधवांच्या भावना अत्यंत तिव्र असून राज्यात विविध ठिकाणी आंदोलने सुरू आहेत, त्या धर्तीवर वाशिम जिल्ह्यात अचानकपणे तीव्र स्वरुपाच्या आंदोलनात्मक कार्यक्रमाचे आयोजनाची शक्यता नाकारता येत नाही तसेच नोकरीमध्ये पदोन्नतीस मागासवर्गीयांना ३३% आरक्षण कायम ठेवावे या मागणीसाठी विविध कर्मचारी संघटनांकडून विविध प्रकारच्या आंदोलनांचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्र सरकारने मंजूर केलेले कृषी विधेयक शेतकरी कर्जमाफी, पीक कर्ज मंजुरी, दूध दरवाढ, वाढती महागाई, वीज बिल माफी, शेतक-यांना नुकसान भरपाई तसेच इतर विविध मागण्या संदर्भात विरोधी पक्षाचे वतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादींच्या वतीने आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या आणि सण उत्सवाचे दृष्टीने अत्यंत संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया आगामी सण उत्सवाचे काळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे याकरीता दिनांक १४-८-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २८-८-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होण्यास पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी, वाशिम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करून दिनांक १४-८-२०२१ रोजीचे ००.०१ वा, पासून ते दिनांक २८-८-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये आदेश प्रतिबंधात्मक आदेश पारित करीत आहे, सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टींकरीता मनाई करण्यात आलेली आहे.

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तीक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे,

(२) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास,

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधने जवळ बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे,

(४) व्यक्तींची प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे विभत्स प्रदर्शन करणे,

(५) वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहिरपणे प्रक्षोभक घोषणा करणे, अशा प्राधिका-यांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितीमत्ता यांस धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथवून पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकांमध्ये प्रसार/प्रचार करणे.

सदर आदेश अंत्ययात्रा, शासकीय सेवेत तैनात कर्मचारी यांना लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक १४-८-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २८-८-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरुप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणताही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणुका कराव्यात.

वाशिम :
दिनांक १३ ऑगस्ट २०२१.

**शण्मुगराजन एस,** (भाप्रसे),
जिल्हादंडाधिकारी,
वाशिम.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७६.

## प्रादेशिक सहसंचालक, यांजकडून

### अंतीम आदेश

क्रमांक प्राससं-प्रशा-वसंतससाका-अं.आदेश-४०३-२०२१.—

मी, आर. जे. दाभेराव, प्रादेशिक सहसंचालक (साखर), अमरावती मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वसंत सहकारी साखर कारखाना म., पोफाळी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ या कारखान्यास या कार्यालयाचे जा.क्र. प्राससं/प्रशा/वसंत ससाका/अं.अ.आदेश/१९२/२०२१, दिनांक ३ मे २०२१ अन्वये दिलेला आदेश कायम करणारा अंतीम आदेश देत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३ अन्वये कारखान्याचे अवसायक म्हणून श्री. वाय. पी. गोतरकर, लेखापरिक्षक श्रेणी-१ अंतर्गत विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), यवतमाळ यांची अवसायक म्हणून नियुक्ती करीत आहे. अवसायक यांनी कारखान्याचे अवसायक पदाचा पदभार त्वरीत घेवून अवसायनाची प्रक्रिया पूर्ण करणेकरीता पुढील कार्यवाही करावी.

अमरावती :
दिनांक १० ऑगस्ट २०२१.

**आर. जे. दाभेराव,**
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
अमरावती.

अ.-एक-२ (१५९८).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.